# L. A. BILL No. XXVIII OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०. २०२१ चा महा. अध्या १०.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

१९४९ चा ५९.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) च्या खंड (अ) मधील, **तक्त्या**ऐवजी, पुढील **तक्ता** दाखल करण्यात येईल :—

" **तक्ता**

| लोकसंख्या (१) | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची संख्या (२) |
|---|---|
| (एक) तीन लाखांपेक्षा अधिक व ६ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ७६ इतकी असेल.<br>३ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १५,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका-सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या ९६ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (दोन) ६ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ९६ इतकी असेल.<br>६ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक २०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका-सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या १२६ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (तीन) १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या १२६ इतकी असेल.<br>१२ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ४०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका-सदस्याची तरतूद करण्यात येईल. तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या १५६ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (चार) २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या १५६ इतकी असेल. |

| लोकसंख्या (१) | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची संख्या (२) |
|---|---|
| | २४ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ५०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका-सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या १६८ इतकी असेल ; |
| (पाच) ३० लाखांपेक्षा अधिक. | निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या १६८ इतकी असेल. |
| | ३० लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १ लाख इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका-सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची कमाल संख्या १८५ इतकी असेल.''. |

प्रकरण तीन

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.**

१९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (२) च्या खंड (अ) मधील, तक्त्याऐवजी, पुढील **तक्ता** दाखल करण्यात येईल :—

**'' तक्ता**

| पालिका क्षेत्राचा वर्ग (१) | निवडून आलेल्या परिषद-सदस्यांची संख्या (२) |
|---|---|
| (एक) '' अ '' वर्ग | निवडून आलेल्या परिषद-सदस्यांची किमान संख्या ४० इतकी असेल आणि १,००,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ८,००० लोकसंख्येकरिता, निवडून आलेला एक अतिरिक्त परिषद-सदस्य असेल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या परिषद-सदस्यांची एकूण संख्या ७५ पेक्षा अधिक होणार नाही ; |
| (दोन) '' ब '' वर्ग | निवडून आलेल्या परिषद-सदस्यांची किमान संख्या २५ इतकी असेल आणि ४०,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ५,००० लोकसंख्येकरिता, निवडून आलेला एक अतिरिक्त परिषद-सदस्य असेल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या परिषद-सदस्यांची एकूण संख्या ३७ पेक्षा अधिक होणार नाही ; |
| (तीन) '' क '' वर्ग | निवडून आलेल्या परिषद-सदस्यांची किमान संख्या २० इतकी असेल आणि २५,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ३,००० लोकसंख्येकरिता, निवडून आलेला एक अतिरिक्त परिषद-सदस्य असेल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या परिषद-सदस्यांची एकूण संख्या २५ पेक्षा अधिक होणार नाही.''. |

प्रकरण चार

**संकीर्ण**

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र नगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२१ चा महा. अध्या. १०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतेही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम ५ मध्ये आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ९ मध्ये निवडून आलेल्या तसेच नामनिर्देशित केलेल्या पालिका-सदस्यांचा व परिषद-सदस्यांचा अंतर्भाव असणाऱ्या महानगरपालिका व नगरपरिषदा घटित करण्यासाठी तरतूद आहे. १९४९ च्या उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (२) च्या खंड (अ) मध्ये आणि १९६५ च्या उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (२) च्या खंड (अ) मध्ये संबंधित महानगरपालिका व पालिका क्षेत्रांच्या लोकसंख्येच्या आधारावर निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांची व परिषद सदस्यांची संख्या विनिर्दिष्ट करण्याच्या प्रमाणाची तरतूद आहे.

२. तत्कालिन विद्यमान तरतुदींनुसार, महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी होती व कमाल संख्या १७५ इतकी होती आणि पालिका क्षेत्रांमध्ये, निवडून आलेल्या परिषद, सदस्यांची किमान संख्या १७ इतकी होती व कमाल संख्या ६५ इतकी होती.

३. महानगरपालिकांच्या आणि पालिका क्षेत्रांच्या निवडून आलेल्या सदस्यांची संख्या, २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या आकडेवारीवरून निर्धारित केलेली होती. कोविड-१९ मुळे, २०२१ च्या जनगणनेची नवीनतम आकडेवारी उपलब्ध नव्हती. तथापि, शहरी लोकसंख्येमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे आणि शहरीकरणाचा वेगदेखील वाढत आहे.

या बाबी विचारात घेता, महानगरपालिका व पालिका क्षेत्रांत बहुसंख्य लोकसंख्येला प्रतिनिधित्व मिळण्याची सुनिश्चिती करण्यासाठी, महानगरपालिका व पालिका क्षेत्रांतील निवडून आलेल्या पालिका-सदस्यांच्या व परिषद, सदस्यांच्या किमान संख्येत आणि त्यानुसार कमाल संख्येत सुधारणा करण्याचे ठरविले होते. म्हणून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या उक्त कलम ५ मध्ये आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या उक्त कलम ९ मध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. १०), हा प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१.

**एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.

## सन २०२१ चे वि.स.विधेयक क्रमांक २८.—महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.

### (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यातील उतारे)

### (सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९)

**१.** ते **४.** ** ** ** ** ** **

**५.** (१) ** ** ** ** ** ** महानगरपालिकेची रचना.

(२) प्रत्येक महानगरपालिका पुढील सदस्यांची बनली असेल—

(अ) प्रत्यक्ष प्रभाग निवडणुकांमध्ये थेट निवडून आलेले खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या संख्येतील पालिका-सदस्य :—

**तक्ता**

| लोकसंख्या<br>(१) | पालिका सदस्यांची संख्या<br>(२) |
|---|---|
| (एक) ३ लाखांपेक्षा अधिक व ६ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी असेल.<br>३ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १५,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या ८५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (दोन) ६ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ८५ इतकी असेल.<br>६ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक २०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या ११५ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (तीन) १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत. | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ११५ इतकी असेल.<br>१२ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ४०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या १५१ पेक्षा अधिक होणार नाही. |
| (चार) २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखांपर्यंत | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १५१ इतकी असेल.<br>२४ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ५०,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या १६१ पेक्षा अधिक होणार नाही. |

| लोकसंख्या<br>(१) | पालिका सदस्यांची संख्या<br>(२) |
| --- | --- |
| (पाच) ३० लाखांपेक्षा अधिक | निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १६१ इतकी असेल.<br>३० लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १,००,००० इतक्या अधिक लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल, तथापि, त्यामुळे निवडून आलेल्या पालिका सदस्यांची अधिकतम संख्या १७५ पेक्षा अधिक होणार नाही. |

(ब) ** ** **

**(३)** ते **(५)** ** ** **

**५अ** व **५ब** ** ** **

**६.** ते **४९३** ** ** **

**(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे.)**

**(सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०)**

**१.** ते **८.** ** ** ** ** ** **

**९.** (१) व (१अ) ** ** ** ** ** ** नगरपालिकेची रचना.

(२) संचालकाने, वेळोवेळी, प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे,—

(अ) निवडून आलेल्या परिषद सदस्यांची संख्या खालील तक्त्यानुसार निश्चित केली पाहिजे :—

**तक्ता**

| पालिका क्षेत्राचा वर्ग<br>(१) | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची संख्या<br>(२) |
|---|---|
| (एक) 'अ' वर्ग | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या ३८ असेल आणि १,००,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ८,००० लोकसंख्येकरिता, निवडून आलेला एक जादा परिषद सदस्य असेल, तथापि, अशारितीने निवडून आलेल्या परिषद सदस्यांची एकूण संख्या ६५ हून अधिक असणार नाही ; |
| (दोन) 'ब' वर्ग | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २३ असेल आणि ४०,००० हून अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ५,००० लोकसंख्येकरिता, निवडून आलेला एक जादा परिषद सदस्य असेल, तथापि, अशारितीने निवडून आलेल्या परिषद सदस्यांची एकूण संख्या ३७ हून अधिक असणार नाही ; |
| (तीन) 'क' वर्ग | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या १७ असेल आणि २५,००० हून अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ३,००० लोकसंख्येकरिता, निवडून आलेला एक जादा परिषद सदस्य असेल, तथापि, अशारितीने निवडून आलेल्या परिषद सदस्यांची एकूण संख्या २३ हून अधिक असणार नाही ; |

(ब) ते (ड) ** ** ** ** ** **

(३) ** ** ** ** ** **

**१०.** ते **३५१** ** ** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८.]**

**[महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई